# विद्या विकास कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर, जिल्हा : वर्धा (महाराष्ट्र)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

(कोरोना प्रादुर्भाव कालावधी लॉकडाऊनमधील कार्यवृत्त अहवाल)

दिनांक : 20 मार्च पासुन लॉकडाउन झाल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपुरचे मार्गदर्शनात कोरोंना प्रादुर्भाव अंतर्गत विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन तत्वांनुसार कार्य सुरू केले.

**जनजागृती :**

प्रथम कोरोना काय आहे कश्यामुळे याचा प्रादुर्भाव होतो त्यापासून दुर कसे राहता येईल याबाबत ग्रामीण भागात जनजागृती होणे आवश्यक होती तेव्हा रासोयाचे स्वंयसेवक व स्वंयसेविका ज्या ज्या खेडेगावात राहतात त्या त्या ठिकाणी जनजागृतीचे काम सुरू केले वारंवार साबनाने हात धुणे, हात किंवा इतर वस्तु सानिटाईझर करणे, मास्कचा सतत वापर करणे गर्दीमध्ये जाऊनये इतरांच्या संपर्कात येवू नये याबाबत सोशल मिडीया, पोस्टर व प्रत्यक्ष पणे जनजागृती करून करोना विषाणू बाबत माहिती पोहचवली.

**आरोग्य सेतु ॲप डाऊनलोड करावे :**

केन्द्र शासनाच्या मार्गदर्शनात मोबाइल मध्ये आरोग्य सेतु ॲप डाऊनलोड करण्याकरिता प्रेरित करण्याकरिता विद्यार्थी प्रत्यक्ष आरोग्य सेतु अप डाउनलोड करण्याकरिता मार्गदर्शन करित होते गावात खेड्यात, महाविद्यालयातील इतर विद्यार्थी, प्राध्यापक यांना मोबाइल मध्ये आरोग्य सेतु अप डाउनलोड करण्याकरिता माहिती देऊन 3 हजार चेवर आरोग्य सेतु अप डाउनलोड करण्यात स्वंयसेवकांना यश आले.

## स्पेशल पोलिस :

राष्ट्रीय सेवा योजनेचे काही विद्यार्थीना आठवडी बाजार, धान्यबाजार याठिकाणी लोकांची गर्दी करू नये याकरिता, स्पेशल पोलिस ऑफीसर म्हणून नियुक्ती करण्यात आले होते त्याप्रमाणे विद्यार्थी आठवडी बाजार, धान्यबाजार, भाजी बाजारात सेवा देत होते यामध्ये कोस्तुभ बोरकर, रोहित बावणे व किरण धाबेकर इत्यादिनी सेवा दिली.

## कार्यक्रम अधिकाऱ्यांची तहसील कार्यालयात नियुक्ती :

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मेघश्याम ढाकरे, यांची कोरोना प्रादुर्भाव नियंत्रण समितीवर तहसीलदार समुद्रपूर यांनी नियुक्ती केली. त्याप्रमाणे तालुका स्तरावर कोरोना विषाणू प्रादुर्भाव नियंत्रणाकरिता विविध उपाययोजना करण्याकरिता तालुका प्रशासनसोबत कार्य सुरू झाले बाहेर गावी जाणारे मजूर वाहने बंद असल्याने ते पायी निघाले होते त्यांना जेवणाची व्यवस्था करून काहींना ध्यान्याची उपलब्ध करून दिल्या जात होती. त्याचप्रमाणे लोकसहभागातून अन्नधान्याची कित तयार करून ते गरजू पर्यंत पोहचविण्याचे काम करून सेवा देत होतो अजूनही सेवा देने सुरू आहे.

## फेसमास्क वाटप :

फेसमास्क कसे बनवायचे याबद्दल जनजागृती करने व फेसमास्क तयार करून वाटप कले. इत्यादी कामे रासोयोच्या स्वयेसेवकांनी केले आतापर्यंत 3000 पर्यन्त मास्क वाटप केले या करिता बी.ए. प्रथम ची संध्या भोयर, किरण धाबेकर व प्रा. डॉ. विना मेंढुले यांनी मास्क तयार करण्याकरिता परिश्रम घेतले तर विविध गर्दीच्या ठिकाणी पोलिस स्टेशन, शासकीय कार्यालयात, गावात फेसमास्कचे वाटप केले. सोबतच फेसमास्क लावण्याची सवय नागरिकांना लागली आहे .

## I Got पोर्टल द्वारे प्रशिक्षण

केन्द्रशासनाच्या युथ मंत्रालायच्या माध्यमातून i Got पोर्टल द्वारे रासोयो स्वंयसेवकांनी प्रशिक्षण घेऊन कोरोना विषाणू प्रादुर्भाव नियमीत व उपाययोजना अंतर्गत कामे करीत होते .

## धान्य वाटप व अन्न पाकीट वाटप

गरीब व गरजू लोकांना धाण्याच्या किट तयार करून 50 व्यक्तींना धान्य वाटप करण्यात आले तर पायी जाणारे अन्य राज्यातील मजुरांना अन्नाचे पोकीट तयार करून वाटप करने व त्याच प्रमाणे त्यांना जेवण देने इत्यादि सेवा देण्याचे काम स्वंयसेवकांनी केले 2000 च्या वर मजुरांना जेवण वाटप करण्यात आले याकरिता धान्याची व्यवस्था तालुका प्रशासनाने केली होती

**स्वस्त धान्य दुकानात विधार्थ्यांच्या नेमणूक**

विविध खेड्यांवर , गावात स्वस्त धान्य दुकान आहे व स्वस्त धान्य दुकानातून शासनाच्या वतीने मोफत धान्य वाटाल्या जाऊ लागल्याने त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ लागली तेव्हा त्या दुकानात गोंधळीची परिस्थिती निर्माण झाली होती तेव्हा तालुका प्रशासनाला पुरवठा निरीक्षक विकास देसाई यांनी रासोयो स्वंयसेवकांचे वेगवेगळ्या खेड्यातील स्वस्त धान्य दुकानात नियुक्ती केली त्यामुळे त्या रासोयो स्वंयसेवकांच्या माध्यमातून सामाजिक अंतर पाळून प्रत्येकाला व्यवस्थित धान्य मिळायला लागले. त्याच प्रमाने ज्या ज्या ठिकाणी गर्दीचे ठिकाण आहेत त्या ठिकाणी स्वंयसेवकांनी उभे राहून सामाजिक अंतर पाळून तशी माहिती त्यांना देत असल्याने सामाजिक अंतर पाळण्याची सवय नागरिकांना झाली. त्याच प्रमाणे बँकेच्या ठिकाणी गर्दी होत असल्याने तेथे सामाजिक अंतर पाळण्याकरिता स्वयसेवकांनी कार्य केले.

**आदर्श आठवडी बाजारात रासोयो स्वंयसेवका कडून जनजागृती**

स्थानिक समुद्रपूरमध्ये आठवडी बाजार भरत असतो. यापूर्वी त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने तो बाजार बंद करण्यात आला होता. तेव्हा नगरपंचायत प्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संकल्पनेतून आदर्श आठवडी बाजार भरविण्यात आला. विकास विद्यालय या शाळेच्या मैदानावर मंडप उभे करून दुकानदारांना जागा देण्यात आली. व एकाच गेटमधून ग्राहकांची नोंद करून ग्राहकांना सानिटाईझर करून त्यांना बाजारात सोडल्या जात होते. सामाजिक अंतर राहील याची काळजी घेतल्या जात होती. रासोयोचे स्वंयसेवक हाती फलक घेऊन जनजागृती करीत होते. तर दुकानात गर्दी होऊ नये या करिता सूचना देत होते. या मधूनच आदर्श आठवडी बाजार उत्कृष्ट पार पडला.

## थात्मक विलगीकरन केंद्र

सदर आमच्या महाविद्यालयात संस्थात्मक विलगीकरण केंद्र उभारण्यात आले ते. त्या ठिकाणी ठेवण्यात येत असलेल्यां व्यक्तीचे देखभाल महाविद्यालयाचा प्राचार्याच्या देखरेखीत ोती.

## नोडल ऑफिसर नियुक्ती

महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नोडल ऑफिसर म्हणून गरपंचायत ने नियुक्ती करण्यात आली होती. त्या मध्ये गृहविलगीकरणा मधे असणाऱ्या व्यक्तीवर हे ोडल ऑफिसर लक्ष ठेवीत होते. यामध्ये महाविद्यालयाचे प्रा. मेघशाम ढाकरे , प्रा. डी. एम. महाकाळे, ा. डॉ. व्ही. एम. चंदनखेडे, प्रा. एस. आर. सारवे, श्री. हर्षल उमरे, श्री. प्रवीण तेलतुंबडे, श्री. धनेश गारी, श्री. लालचंद डेकटे व श्री. प्रदीप कापकर इत्यादिची नियुक्ती करण्यात आली होती व सध्या काम रत आहेत.

प्रा. डॉ. राजविलास कारमोरे
प्राचार्य
विद्या विकास कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय समुद्रपूर जिल्हा वर्धा 442305